पुढारी

# इलेक्ट्रिसिटी कर्मचाऱ्यांचे रक्तदान

**भाईंदर :** कोव्हिड-१९ विरोधातील लढा अजूनही सुरू असताना इतर काही आव्हाने देखील उद्भवत आहेत. शहरातील रक्तपेढ्या व रुग्णालयांमध्ये थॅलेसीमिया, सिकल सेल व हिमोफिलियाने पीडित रुग्णांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी रक्ताचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. ही बाब लक्षात घेता अदानी इलेक्ट्रिसिटीच्या कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेत शहरातील रुग्णांच्या रक्तपुरवठ्यासाठी रक्तदान करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अदानी इलेक्ट्रिसिटी, मुंबई लिमिटेडच्या भाईंदर कार्यालय परिसरामध्ये राज्य रक्त संक्रमण परिषद व अदानी फाउंडेशनच्या सहकार्याने ७ व ८ जानेवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यात कर्मचाऱ्यांनी कुटुंबासोबत रक्तदान केले. यावेळी सामाजिक अंतरासह मास्क वापरून शिबिराच्या ठिकाणी स्वच्छतेची काळजी घेण्यात आली होती. यावेळी रक्तदात्यांना सेफ्टी किट्सचे वितरण करण्यात आले.